**न्यायालयीन प्रकरण/तात्काळ**

क्र. पोमसं/१४/६६/विशेष वकीलांचे पॅनल/४६९/२०१०                मुंबई, दि. ०४/१/२०१७

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०,
दि. १२/०५/२०१५ व दि. २१/१०/२०१६ चे शुध्दीपत्रक.

**विषय :-** विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्याची कार्यपध्दती.

**************

**परिपत्रक :-**

शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावात बऱ्याच प्रमाणात त्रुटी आढळून येतात. सदर बाब विचारात घेऊन शासनाने यापुढे विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्याच्या प्रस्तावात संदर्भाधीन निर्णायातील अटी व शर्तीसह खालील बाबींचा समावेश होणे आवश्यक आहे.

१. संबंधित वकीलांचे संमतीपत्रात खालील बाबीचा समावेश करणे आवश्यक आहे.

**अ)** संबंधित वकीलांनी त्यांची वकीली व्यावसायात सातत्याने १० वर्षे पुर्ण केलेली असावी.

**ब)** शासन निर्णय, दि. १५/०२/२०१४ मध्ये नमूद फी त्यांना मंजूर असून सदर शासकीय फीच्या दराने ते काम करण्यास तयार असावे.

**क)** विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाल्यास न्यायालयीन प्रकरण सोपविल्यास त्या प्रकरणातील आरोपींच्या वतीने यापुर्वी कधीही काम पाहिले असल्यास अशी प्रकरणे स्विकारणार नाही, याबाबत लेखी पत्र.

२. शासनास सादर केलेल्या संमतीपत्रात खालील बाबी नमूद कराव्यात.

**१.** सनदेची प्रत.

**२.** गेल्या १० वर्षात किंवा त्यापेक्षा जास्त कार्यकाळ व्यतीत केला असेल अशा कार्यकाळातील त्यांनी लढलेली न्यायालयीन प्रकरणे याबाबतचा कामकाजाचा तपशिल (Career Profile).

२. सदर प्रस्तांवाची शासन निर्णय, दि. १२/०५/२०१५ व शुध्दीपत्रक, दि.२६/१०/२०१६ मधील अटीं व शर्तीचे परिपूर्ण छाननी करुन, प्रस्तावांमध्ये त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेष सरकारी अभियोक्तांचे पॅनल तयार करण्यास वर नमूद कागदपत्रांसह अभियोक्तानिहाय प्रस्ताव या कार्यालयाच्या मार्फतीने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करण्याचे कळविले आहे.

३. तरी खालील नमूद सर्व पोलीस घटक प्रमुखांना याद्वारे सूचित करण्यात येते की, विशेष सरकारी अभियोक्तांचे पॅनल तयार करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करताना तो परिपूर्ण/ स्वयंस्पष्ट असल्याची खात्री करुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रासह मार्फतीने सादर करण्याबाबत संबंधितांना योग्य ती सूचना दयावी, जेणेकरुन प्रकरणाचा निपटारा करण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब टाळता येईल.

**(प्रभात कुमार)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त.
सर्व अपर पोलीस महासंचालक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक.

**प्रत :-**

पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक (गुन्हे), म.रा., मुंबई.

कार्यासन अधिकारी, का. क्र. ३६.

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, म.रा.,मुंबई.

२/- यांना विनंती आहे की, वरील परिपत्रक कृपया महाराष्ट्र पोलीस विभागातील संकेत स्थळावर फ्लॅश करण्यात यावे.

Sub :- Regarding necessary documents to be furnished while sending proposals for appointment of Spl. Public Prosecutor in the Panel for every distt.